REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १५ पुणें, बुधवार तारीख ७ डिसेंबर, १९४९ अंक ४७


## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

## आनंदाची वार्ता.

**मेसर्स स्कोडा कंपनीकडून खरेदी केलेली एक हजार टनांची साखरेची सर्व मशिनरी मुंबईस येऊन फॅक्टरीवर पाठविण्याची तजवीज झाली.**

साखर विक्रीवर सरकारी निर्बंध असल्यामुळें कंपनीचे भागीदार, ठेवीदार व हितचिंतक यांच्या सक्रिय आर्थिक मदतीनें वरील यश मिळवितां आलें.

**वरील मशिनरीची फॅक्टरी पोंच किंमत पस्तीस लक्ष रुपये आहे.**

दर वर्षी एक कोटी रुपये किंमतीची साखर वरील मशिनरीनें तयार करतां येईल.

सरकारी नियमाप्रमाणें भागीदार व त्यांचे मित्र यांना शेअरविक्री चालू आहे.

**मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात.**

मुदत १ वर्ष—व्याजाचा दर द. द. शें. ५ टके
मुदत २ वर्षे—व्याजाचा दर द. द. शें. ५॥ टक्के.
मुदत ३ वर्षे—व्याजाचा दर द. द. शें. ६ टक्के.
व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

कॉमनवेल्थ बिल्डिंग,
९८० सदाशिव पेठ,
लक्ष्मी रोड, पुणें २.
५ डिसेंबर १९४९.

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
बी. ए., एलएल. बी.
सी. जी. आगाशे अ‍ॅण्ड को.,
मॅनेजिंग एजंटस्.

# पांच हॉर्स पावरचें डिझेल एंजीन

घ्यावयाचें म्हणजे तें किर्लोस्कर पीटरच! संपूर्ण पंपिंग सेटही मिळेल. चौकशी करा.

**केळकर बंधू, बुधवार चौक, पुणें शहर.**


## विविध माहिती

**सरकारी तिजोऱ्यांची कार्यक्षमता**—सरकारी तिजोऱ्यांच्या कामाची कार्यक्षमता वाढविण्याच्या हेतूनें जमाबंदी आणि तिजोरी खात्यांची फारकत करण्याचा मुंबई सरकारचा विचार आहे. सध्या तालुक्याचा मामलेदार हाच तिजोरीचें काम पहात असतो. त्याऐवजीं आतां तिजोऱ्या आणि पोट-तिजोऱ्या ह्यांचें काम पहाण्यासाठीं खास अधिकारी नेमण्यांत येणार आहेत असें समजतें. ह्या सुधारणेमुळें तिजोऱ्यांचीं कामें अधिक व्यवस्थित पार पडून सरकारच्या 'अधिक धान्य पिकविण्याच्या' मोहिमेलाही साह्य होईल असा अंदाज आहे. सध्या मामलेदार आणि कलेक्टर ह्यांनाच धान्यमोहिमेकडे लक्ष पुरवावें लागतें. मुंबई सरकारनें ह्या बाबतींत सूचना करण्यासाठीं एक कमिटी नेमली होती. कमिटीवर अकौंटंट जनरल, रिझर्व्ह बँकेचे प्रतिनिधी आणि फडणिशी खात्याचे प्रतिनिधी होते. कमिटीनें आपल्या अहवालांत वरील प्रमाणें फारकत करावी अशी शिफारस केली आहे. सरकारनें ती मान्य केल्यास पुढील फडणिशी वर्षापासून ही सुधारणा अमलांत आणली जाईल.

**उर्दू टंक लेखन यंत्र**—पाकिस्तान सरकार उर्दू टाइपरायटींचीं यंत्रें बनाविण्यासाठीं एक कारखाना काढण्याचा विचार करीत आहे. त्यासाठीं कांहीं परकीय कंपन्यांनीं पाकिस्तान सरकारला मदत करण्याची तयारी दाखविली आहे.

**पुस्तकांचें प्रदर्शन**—कॅनडांतील विद्यापीठांसाठीं ६०० ब्रिटिश पुस्तकांचें एक प्रदर्शन पुढील वर्षी ब्रिटनतर्फे त्या देशांत नेण्यांत येणार आहे. हीं पुस्तकें शास्त्रीय आणि इतर अभ्यासक्रमाचीं असून त्यांचा पदवीपूर्व आणि पदवीनंतरच्या अभ्यासाला उपयोग होण्यासारखा आहे.

**मुंबईंत 'मर्फी' रेडिओचा कारखाना**—गेल्या मे महिन्यांत मर्फी रेडिओ ऑफ इंडिआ नांवाची कंपनी मुंबईंत स्थापन करण्यांत आली होती. आतां कंपनीच्या कामाला प्रारंभ करण्यांत आला आहे. ह्या कंपनीचा कारखाना १३ हजार चौ. फूट क्षेत्रफळावर पसरलेला आहे. कारखान्यांत दरवर्षी १५ हजार रेडिओ सेट्स् तयार होऊं शकतील. त्याशिवाय, आणखी थोडी यंत्रसामुग्री आणल्यास उत्पादन २० हजार सेटसपर्यंतही वाढूं शकेल.

**उत्पादनाचा पुढील वर्षीचा पल्ला**— हिंदुस्थान सरकारनें पुढील वर्षी कोणत्या धंद्यानें किती उत्पादन करावें ह्यासंबंधीं कांहीं औद्योगिक लक्ष्यें जाहीर केलीं आहेत. तीं पुढील प्रमाणें आहेत. कोळसा ३१ कोटी टन; पोलाद १० लाख टन; डिझेल एंजिन्स ०३,०००; सल्फ्युरिक ॲसिड १० लाख टन; सुपर फॉस्फेट्स ५०,००० टन; अल्युमिनम ३,५०० टन; सायकलींच्या टायर्स आणि ट्यूब्स् ६० लाख जोड्या; मोटार टायर्स व ट्यूब्स १० लाख जोड्या; पॉवर अल्कोहल १ कोटी गॅलन्स; कांच १ लाख टन आणि रिफ्रॅक्टरीज २,२५,००० टन.

**नागपूरजवळ सिनेमाचा स्टुडिओ**—भारत फिल्म कॉर्पोरेशन लि., नागपूर, ह्या कंपनीनें नागपूरपासून १० मैलांवर कामटी येथें आपला स्टुडिओ उभारला आहे. प्रत्यक्ष चित्रपट घेण्याच्या कामास ता. १५ जानेवारी १९५० रोजीं प्रारंभ होईल असें समजतें. कंपनीनें डेहराडून येथील राजस्थान स्टुडिओचें सर्व साहित्य ४ लाख रुपयांना खरेदी केलें आहे. कंपनीचे तंत्रज्ञ नॉर्दर्न इंडिआ स्टुडिओमधील आहेत.

**बिन तिकिटाच्या प्रवाशांना दंड**—ईस्टर्न पंजाब रेल्वेच्या पोलिसांनीं विना तिकिट प्रवास करणाऱ्या प्रवाशांची एकाएकीं झडती घेतली. एकूण ५,९६२ प्रवासी विना तिकिट प्रवास करीत होते. त्यांच्याकडून २३,९९९ रुपये दंड म्हणून वसूल करण्यांत आले. ६० जणांना दंड भरण्याची ऐपत नव्हती म्हणून त्यांना तुरुंगांत घालण्यांत आलें. ह्याशिवाय २२५ प्रवाशांजवळ बेकायदा हत्यारें, धान्य इत्यादी वस्तू सांपडल्या.

**जपान-हिंदुस्थान व्यापार**—हिंदुस्थान आणि जपान ह्यांच्या दरम्यान नुकताच एक व्यापारी करार करण्यांत आला आहे. कराराप्रमाणें जुलै १९४९ पासून जून १९५० पर्यंत जपानमधून हिंदुस्थानांत २·३ कोटी डॉलर्सचा म्हणजे जवळजवळ ७॥ कोटी रुपयांचा माल आयात करण्यांत येणार आहे. ह्या मालापैकीं १ कोटी डॉलर्सचा माल भांडवली स्वरूपाचा आहे. बीज उत्पन्न करण्याचीं यंत्रें व इतर उपकरणें ह्यांचा त्यांत समावेश होतो. त्याशिवाय ८२ लाख रुपये किंमतीच्या टेलिफोनच्या ताराही आयात केल्या जातील. जपानच्या भांडवली मालाच्या किंमती इतर देशांच्या मानानें कमी आहेत आणि माल लवकर देण्याचेंही जपाननें कबूल केलें आहे.

**हिंदी कांचेच्या कारखान्यांत परकीय भागीदारी**—बॉंबे ग्लास वर्क्स लि. आणि अलाहाबाद ग्लास वर्क्स लि. ह्या दोन हिंदी कांचेच्या कारखान्यांनीं एका ऑस्ट्रेलिअन कांच कारखान्याला भागीदार म्हणून घेण्याचें ठरविलें आहे. कांचेच्या धंद्याची पुनर्घटना आणि विस्तार करण्यासाठीं ही नवी व्यवस्था करण्यांत आली आहे. भागीदारीमुळें ऑस्ट्रेलिअन कंपनीचे पेटंटचे हक्क आणि परवाने, हिंदुस्थान आणि पाकिस्तान दोन देशांपुरते, हिंदी कंपन्यांना मिळणार आहेत.

**स्वखुषीच्या पगार-कपातीवर कराची माफी**—हिंदुस्थान सरकारच्या बचतीच्या धोरणाला अनुसरून कांहीं बड्या अधिकाऱ्यांनीं आपल्या पगारांत स्वखुषीनें कपात करून घेतली आहे. अशा नौकरांनीं आपल्या पगारांत जितकी कपात मान्य केली असेल त्या रकमेवर प्राप्तीवरील कर आणि सुपर टॅक्स रद्द करणारा वटहुकूम हिंद सरकारनें काढला आहे. हा वटहुकूम काढला नसता तर पगारांत करून घेतलेल्या कपातीच्या रकमेवरही त्यांना प्राप्तीवरील कराच्या कायद्यान्वयें कर द्यावा लागला असता.

**राब काढण्याच्या परवान्याची फी कमी झाली**—मुंबई सरकारनें एक हुकूम काढून साखरेच्या कारखान्यांना राब काढण्याबद्दल आणि विकण्याबद्दल जी परवाना-फी द्यावी लागते ती कमी केली आहे. पूर्वी ही फी १०,००० रुपये होती. कारखान्यांनीं आपलें उत्पादन वाढवावें म्हणून ही फी आतां अवघी ५० रुपये ठेवण्यांत आली आहे. दक्षिणेंतील साखर-कारखानदारांनीं ह्या जबर परवाना फी-विरुद्ध सरकारकडे तक्रार गुदरली होती. १ लाख गॅलनपर्यंत स्पिरिट तयार करणाऱ्या कारखान्यांकडूनही आतापर्यंत १०,००० रुपये परवाना फी घेण्यांत येत असे. ह्या फीची आकारणीही आतां फक्त १०० रुपयेच करण्यांत येणार आहे.

# अर्थ

बुधवार, ता. ७ डिसेंबर, १९४९



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

## उत्पादन वाढूनही सर्वत्र सुबत्ता होईलच, असें नाहीं.

संयुक्त—राष्ट्रसंघटनेच्या अन्न आणि शेतकी विभागानें आपला वार्षिक अहवाल नुकताच प्रसिद्ध केला आहे. अहवालाचें सार म्हणून असें नमूद करण्यांत आलें आहे कीं पूर्वी ज्या लोकांचा आहार चांगला होता त्यांचा आतां अधिकच सुधारला आहे. उलटपक्षीं, ज्यांचें खाणेंपिणें निकृष्ट दर्जाचें होतें त्यांची मात्र अधिकच वाईट अवस्था झाली आहे. अहवालाच्या वर्षीं साखर, स्निग्ध पदार्थ, मासे, फळें, भाजीपाला, इत्यादींचें उत्पादन खूपच वाढलें आहे, हें खरें; तथापि एकंदर जगाच्या लोकसंख्येपैकीं तीन चतुर्थांश लोकांना ह्या उत्पादन-वाढीचा जवळ जवळ कांहींच उपयोग झालेला नाहीं. ह्या लोकांचे वाडवडील जितक्या दारिद्र्यावस्थेंत दिवस काढीत होते, तितक्याच हलाखीच्या परिस्थितींत जगांतील हे पाऊण हिस्सा लोक आजहि काळ कंठीत आहेत. ही परिस्थिति विशेषत: मागासलेल्या आणि विकासास वाव न मिळालेल्या देशांत अनुभवास येते, हें उघडच आहे. सध्या पूर्वेकडील सर्वच देशांतून उत्पादन—वाढीचे आदेश कमी अधिक तीव्रतेनें एकसारखे देण्यांत येत आहेत. उत्पादन बरेंच वाढल्याशिवाय त्याच्या विभागणीचे आणि रहाणीचें मान वाढविण्याचे प्रश्न उद्‌भवूंच शकत नाहींत हें तर खरेंच; पण त्याचबरोबर उत्पादित वस्तूंची आणि पदार्थांची योग्य वाटणी करण्याचें शास्त्र अवगत असल्याशिवायहि दारिद्र्याचा प्रश्न सुटूं शकत नाहीं असें संघटनेच्या वरील अहवालावरून दिसून येत नाहीं काय ?

अहवालांत आणखी एक महत्त्वाचा मुद्दा नमूद करण्यांत आलेला आहे. गरीब देश आणि श्रीमंत देश ह्यांच्यांतील रहाणीच्या मानांत जी तफावत पूर्वी दिसून येत होती, ती कमी झाल्याचें दिसून येत नाहीं. दुसरें महायुद्ध संपल्यापासून पूर्वीच्या साम्राज्यांचीं ' राष्ट्रकुटुंबें ' बनविण्यांत येऊं लागलीं. ब्रिटन, फ्रान्स, हॉलंड, ह्या सर्व साम्राज्यवादी राष्ट्रांनीं आपल्या साम्राज्यांचा एक प्रकारचा कायापालट करण्याचे प्रयत्न केले; आणि ते थोड्याबहुत अंशानें यशस्वीही झाले अगर होत आहेत. साम्राज्यांचें राष्ट्रकुटुंबांत परिवर्तन केल्यानें राजकीय घटना म्हणून काय फरक झाला असेल तो असो, परंतु आर्थिक दृष्ट्या पुढारलेले उद्योगप्रधान देश आणि मागासलेले शेतकीप्रधान देश ह्यांच्या परस्परसंबंधांत म्हणण्यासारखा फरक पडलेला दिसत नाहीं. राष्ट्रकुटुंबाच्या कल्पनेंत राजकीय समानतेची भूमिका आहे, तीमुळें केवळ आर्थिक समानता निर्माण होणार नाहीं असाच ह्याचा अर्थ होत नाहीं काय ? एरवीं, गरीब आणि श्रीमंत राष्ट्रें ह्यांच्या रहाणींतील फरक होता तसाच कायम रहाणें अशक्य, निदान कठीण झालें असतें, असें मानण्यास भरपूर जागा आहे.

अहवालांत पुढें असें म्हटलें आहे कीं, सध्या जीं जीं सरकारें दारिद्र्य आणि निकृष्ट दर्जाचा अन्नपुरवठा, ह्यांच्या विरुद्ध झगडत आहेत, त्यांच्या पुढें दोन प्रश्न प्रामुख्यानें उभे आहेत. त्यांपैकीं एक, मागासलेल्या देशांत यांत्रिक साहित्य आणि तें वापरण्याचें ज्ञान हीं दोन्हीं उपलब्ध करून देणें हा असून दुसरा प्रश्न शेतीच्या मालाचा उठाव वाढविण्यासाठीं मार्ग खुला करून देणें, हा आहे. उठाव वाढविण्यासाठीं, उत्पादनावरील नियंत्रणें आणि निरनिराळ्या देशांच्या चलनामुळें उत्पन्न झालेले अडथळे, ह्या दोन्हींचा निरास करणें आवश्यक आहे. अहवालांत नमूद करण्यांत आलेल्या वरील दोनहि प्रश्नांचें स्वरूप फारच गुंतागुंतीचें आहे. मागासलेल्या देशांना आधुनिक यंत्रसाहित्य आणि यंत्रज्ञान उपलब्ध करून देण्यास इंग्लंड-अमेरिकेसारखीं राष्ट्रें तयार आहेत. परंतु, ही मदत काय अटींवर देण्यांत येते हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. ह्या मदतीच्या मागोमाग आर्थिक वर्चस्वाची दोरखंडें जर मागासलेल्या राष्ट्रांच्या हातापायाभोंवतीं गुंडाळलीं जाणार असतील, तर ती मदत न घेण्याकडेच त्यांचा कल होणें स्वाभाविक नाहीं काय ?

निरनिराळ्या राष्ट्रांनीं, विशेषत: शेतीप्रधान राष्ट्रांनीं, शेतीच्या मालाचा व्यापार वाढवावा हें म्हणणें योग्य आहे. परंतु ह्या व्यापारांत शेतीच्या मालाच्या किंमती आर्थिक दृष्ट्या न परवडण्या इतक्या घसरतां कामा नयेत इकडेही लक्ष दिलें गेलें पाहिजे. नाहीं तर, १९२९ सालच्या आर्थिक संकटाप्रमाणें मागासलेल्या देशांना पुन्हा बिकट अशा परिस्थितीस तोंड द्यावें लागणें अपरिहार्य होईल. आजच्या आंतरराष्ट्रीय व्यापारांत फार विलक्षण परिस्थिति उत्पन्न झाली आहे; सर्वच देश निर्यात वाढवून आयात कमी करण्याच्या खटपटींत आहेत. हें खरें असलें तरी हा प्रयोग सर्वांना साधणें शक्य नाहीं, हेंही तितकेंच सत्य आहे. कारखाने आणि शेतमाल, ह्या दोन्हीं बाबतींत जवळजवळ स्वयंपूर्ण असलेल्या अमेरिकेला वरील धोरण बऱ्याच प्रमाणांत यशस्वी करतां येईल. परंतु तेंही कांहीं काळच. अशा परिस्थितींत कच्चा माल आणि पक्का माल ह्यांची देवाण-घेवाण कशी वाढावी ?

१९४८—४९ सालीं जगांत एकंदरीनें अन्नधान्याची वाढ बऱ्याच प्रमाणांत झाली; आणि तरी सुद्धां प्रत्येक व्यक्तीला युद्धापूर्वी जितकें अन्न मिळत होतें त्यापेक्षांही आज कमी मिळतें अशी माहिती अहवालांत देण्यांत आली आहे. तात्पर्य, प्रत्यक्ष उत्पादनांत येणाऱ्या तांत्रिक अडचणी फारशा दुर्लंघनीय नसून अर्थव्यवस्था समाजाभिमुख करणें हीच समस्या बिकट होऊन राहिली आहे. संयुक्त संघटनेच्या अन्न आणि शेतीविभागाच्या अहवालाच्या निमित्तानें ह्या पेंचाकडे लक्ष वेधलें गेलें, तरीसुद्धां मोठी उपयुक्त कामगिरी केल्यासारखें होईल.

---

रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर—वॉशिंग्टन येथील हिंदी वकिलातीचे आर्थिक सल्लागार श्री. सुंदरेशन ह्यांची रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर म्हणून येत्या जानेवारीपासून नेमणूक करण्यांत आली आहे. श्री. सुंदरेशन ह्यांनीं इंटरनॅशनल मॉनेटरी बँक आणि फंड व संयुक्त—राष्ट्र संघटनेची बजेट ॲडमिनिस्ट्रेशन ह्या संस्थांवर जबाबदारीचीं कामें केलेलीं आहेत.

### आदिवासी कामगारांची सहकारी संघटना

सहकारी चळवळीच्या दृष्टीनें एक लक्षांत भरण्यासारखी घटना नुकतीच घडून आली आहे. मुंबई प्रांतांतील आदिवासी मजुरांच्या सहकारी संस्था स्थापन करण्यांत आल्या आहेत. प्रांतिक सरकारच्या जंगल खात्याकडून कामाचीं कंत्राटें मिळविणें हा ह्या संस्थांचा उद्देश आहे. ज्या ठिकाणीं अशा सहकारी संस्था यशस्वी झाल्या आहेत, त्या ठिकाणीं जंगल खात्याकडून कामें मिळविणाऱ्या खाजगी कंत्राटदारांकडून होणाऱ्या पिळणुकीपासून आदिवासी मजूर मुक्त झाले आहेत. ह्या संस्था अर्थातच उत्पादकांच्या सहकारी संस्था आहेत. ह्या धंद्याचें चालकत्व आपणाकडे घेऊन आर्थिक स्वातंत्र्य मिळवितां येईल ही महत्वाची गोष्ट, अशा संस्थांमुळें, मागासलेल्या आदिवासी मजुरांच्या लक्षांत येईलच. परंतु त्याहीपेक्षां महत्वाची बाब ही कीं, सहकारी संस्थांच्या विविध प्रकारच्या कार्यांत भाग घेतल्यानेंच अरण्यनिवासी आदिवासींची मूलभूत सुधारणा घडून येणें शक्य आहे. सुधारणेचा प्रारंभ म्हणून वरील सहकारी संस्था फार महत्वाच्या आहेत. त्या दृष्टीनें पहाता बॉम्बे प्रॉ. को. इन्स्टिट्यूटनें ता. १० व ११ डिसेंबरला आदिवासी मजूर–सहकारी संस्थांची जी परिषद भरविण्याचें ठरविलें आहे, ती उपयुक्त ठरेल ह्यांत शंका नाहीं. ह्या परिषदेंत मुंबई प्रांतांतील आदिवासी जनतेची प्रगति आणि कल्याण साधण्याच्या हेतूनें कार्य करण्यांत येणार आहे. श्री. जे. सी. कुमारप्पा ह्यांनीं परिषदेचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याचें कबूल केलें आहे.

---

### सहकारी बँकांच्या शाखांना मदत

बॉम्बे प्रॉ. को. बँक, सेंट्रल बँका आणि बँकिंग युनिअन्स, ह्या संस्थांच्या ज्या नव्या शाखा आर्थिक दृष्ट्या आंतबट्ट्याच्या होतील, त्यांना पैशाची मदत करण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. ह्या संस्थांनीं, शेतकऱ्यांच्या कर्जाच्या मागण्यांचा झटपट निकाल लावावा आणि पैशाचा बटवडा लवकर करावा म्हणून, अधिक शाखा काढाव्या अशी सरकारची इच्छा आहे. म्हणून अशा शाखांना अगर पे–ऑफिसांना तीन वर्षें पर्यंत मदत देण्याचा अधिकार रजिस्ट्रार ऑफ को. सोसायटीज आणि डायरेक्टर, अग्रिकल्चरल मार्केटिंग अँड रूरल फिनान्स ह्यांना देण्यांत आला आहे. रजिस्ट्रारच्या सांगण्यावरून अगर त्यांच्या संमतीनें ज्या शाखा उघडण्यांत येतील त्यांनाच मदत देण्यांत येईल. २५ जून १९४८ पूर्वी उघडण्यांत आलेल्या शाखांना ही मदत मिळणार नाहीं. शाखेला अगर पे ऑफिसला प्रत्यक्ष जितकें नुकसान आलें असेल तितकीच मदत मिळणार आहे. जास्तींत जास्त मदत ५,००० रुपये मिळूं शकेल. मदत पुढील तक्त्याप्रमाणें देण्यांत येईलः–

| शेतीविषयक दिलेलें कर्ज ( वार्षिक ) | मदत |
|---|---|
| २०,००० रु. पेक्षा कमी | ५,००० रु. |
| २०,००० रु. ते ५०,००० रु. | ४,००० रु. |
| ५०,००० रु. ते १,००,००० रु. | ३,००० रु. |
| १,००,००० रु. पेक्षा अधिक | २,५०० रु. |

शाखेचें उत्पन्न आणि खर्च अजमावतांना त्या शाखेच्या भौगोलिक मर्यादेंत तिनें केलेले सर्व प्रकारचे व्यवहार लक्षांत घेतले जातील.

---

साखरेच्या किंमती कायद्यानें निश्चित करण्यांत आल्या— भारत सरकारनें एक खास गॅझेट काढून ई–२७ दर्जाच्या साखरेची कारखान्यांतील किंमत दर मणीं २८ रु. ८ आ. ठरविली आहे. या किंमती ऊंस गाळणीच्या येत्या हंगामापुरत्या आहेत.


( मिरज येथें १९२९ सालीं स्थापन झालेली भागीदारांची जबाबदारी मर्यादित )

**दि मिरज स्टेट बँक लि.**

–मिरज–

शेड्यूल्ड बँक

( स्थापना : १९२९ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. २५,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | ... | रु. १२,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. ५,७०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ७०,००,००० |

शाखा

★ लक्ष्मेश्वर ( जि. धारवाड )
★ कुर्डूवाडी, पंढरपूर व अकलूज ( पे ऑफिस )

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, माल, स्थावर मिळकत वगैरेचे तारणावर कर्ज अगर कॅश क्रेडिट दिलें जातें. समक्ष चौकशी बँकेकडे करावी अगर लिहावें.

डॉ. कृ. गो. गोसावी, चेअरमन.
के. डी. शिराळकर मॅनेजर

**धी बँक ऑफ सिटिझन्स लि.**

स्थापना १९२७

मुख्य कचेरीः १५१४ मारुती गल्ली, बेळगांव.
शाखाः बेळगांव, धारवाड, विजापूर व कारवार जिल्ह्यांतील मुख्य ठिकाणीं.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | १०,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | ७,००,००० रु. |
| भरलेलें भांडवल | ३,४७,००० रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,००,००० रु. |
| खेळतें भांडवल | ३६,००,००० रु. |

जनरल मॅनेजर
बँक ऑफ सिटिझन्स लि.
बेळगांव.

# रूरल बँकिंग चौकशी कमिटी

## प्रश्नपत्रिकेंतील प्रश्न

( सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भारत सरकारनें नेमलेल्या रूरल बँकिंग इन्क्वायरी कमिटीनें आपली प्रश्नपत्रिका काढली आहे. तिचीं उत्तरें कमिटीकडे ( रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया बिल्डिंग, मुंबई नं. १ ) २१ डिसेंबर, १९४९ पूर्वी पोंचवावीत. कमिटीच्या चौकशीच्या क्षेत्रांतील वरील प्रश्नांखेरीज इतर प्रश्नांवरहि विचार व्यक्त करण्यास हरकत नाहीं. कमिटीनें सरकारकडे १५ फेब्रुवारीचे आंत आपला रिपोर्ट सादर करावयाचा आहे. त्यामुळें उत्तरें पाठविण्यास फार थोडी मुदत मिळालेली आहे. शक्य तर, उत्तरांच्या ६ प्रती धाडाव्या म्हणजे कमिटीचा वेळ वाचून काम सोपें होईल अशी कमिटीची विनंति आहे. )

( शक्य तेथें उत्तराची कारणमीमांसा द्यावी. एखाद्या प्रश्नाच्या उत्तरांतील माहितीस सरकारी किंवा इतर प्रसिद्ध वा अप्रसिद्ध चौकशीचा आधार असेल, तर त्याचा उल्लेख करावा. )

प्रश्न-१ ( अ ) गेल्या कांहीं वर्षांत खेडेगांवीं जनतेची क्रयशक्ति वाढली आहे, ह्याविषयीं तुमचें मत काय आहे ? अशी क्रयशक्ति वाढली आहे असें तुमचें मत असल्यास, तिचा उपयोग सध्या कसा केला जात आहे ? ( ब ) बचत करण्याजोगी किंवा केली जात असणारी मोठी कूस रहात आहे, असें तुम्हांस वाटतें काय ? ( क ) अशा वार्षिक बचतीचा ( i ) सबंध देशाबाबत, ( ii ) तुमच्या प्रांताबाबत, संस्थानाबाबत किंवा युनियनबाबत, ( iii ) तुमच्या जिल्ह्याबाबत, तुमचा अंदाज काय आहे. ? ( ड ) खेडेगांवी जनतेंत अशा बचतीची वाटणी ( i ) मोठे जमीनदार, ( ii ) लहान जमीनदार, ( iii ) कुळें व मजूर, ( iv ) इतर ह्यांत कशी झाली आहे, ह्याची कल्पना देतां येईल काय ? ( इ ) तुमच्या प्रांतांत, संस्थानांत किंवा युनियनमध्यें बचतीचें तौलानिक दृष्ट्या जरा जास्त केंद्रीकरण कोठें झालें आहे ? का, ही बचत सबंध देशांत सर्व खेडेगावी मुलुखांत सारख्या प्रमाणांत विभागली आहे, असें तुमचें मत आहे ? ( फ ) सध्यां कोणत्या स्वरूपांत ही बचत ठेवण्यांत आलेली आहे ? ( ग ) बचतीची सध्याची गति कायम रहाण्याचा संभव आहे, असें तुम्हांस वाटतें काय ?

प्रश्न-२ ( अ ) ठेवी स्वीकारणें, ( ब ) पैशाची वर्गावर्गी व करवसुली, ( क ) सोनें-चांदीवर, मालावर आणि इतर प्रकारच्या तारणावर कर्जे, ( ड ) सेफ डिपॉझिट्स, ह्याबाबत खेडेगांवी जनतेला सध्यां व्यापारी बँका किंवा सहकारी बँका कोणत्या सोयी-सवलती देत आहेत ?

प्रश्न-३ खेडेगांवीं परिस्थितीची सद्यःस्थिति आणि खेडेगांवांची सुधारणा करण्यासाठी सरकार करीत असलेली योजना, ह्यांची तुम्हांस जी माहिती आहे, तिचेवरून वेगवेगळ्या प्रकारच्या ( उ. वेगवेगळ्या प्रकारच्या ठेवी स्वीकारणें, कर्जे देणें, पैशाची वर्गावर्ग करणें आणि मौल्यवान जिनसांची सेफ कस्टडी ) बँकिंगच्या सोई अशा ठिकाणीं उपलब्ध करून देण्यास किती वाव आहे, हें सांगू शकाल काय ?

प्रश्न-४ ( १ ) खेडेगांवी प्रदेशांत बँकिंगच्या प्रसारांत सध्यां कोणते अडथळे आहेत, आणि ते खालील कारणांमुळें निर्माण होत असल्यास त्यावर तुमची उपाययोजना काय आहे ?—

( अ ) खेडेगांवीं जनतेची निरक्षरता आणि पासबुकें व चेकबुकें ह्यांचा उपयोग करण्याची आणि साधारणतः बँकांशीं व्यवहार करण्याची त्यांची अपात्रता ( ब ) बँकांत पैसे ठेवण्याबाबत पुराणप्रियता आणि अनिच्छा ( क ) बँकांत ठेवी ठेवण्यास खेडुतांना आकर्षण्यास पुरेसा भारी व्याजाचा दर देण्याची बँकांची अशक्यता ( ड ) स्थानिक ठिकाणीं पैसे गुंतविण्यास अपुऱ्या पडणाऱ्या ठेवी व सोईचा अभाव, ह्यामुळें खर्चाचें पडणारें भारी प्रमाण. ( २ ) बँकिंगच्या प्रसारास अडथळा आणणारे कायदेशीर किंवा इतर निर्बंध हिंदुस्थानांत कोठें आहेत काय, कीं जे दूर करणें असा प्रसार सुलभ होण्यास आवश्यक आहे ?

प्रश्न—५ ( १ ) तुमच्या प्रांतांतील, संस्थानांतील किंवा युनियनमधील सहकारी बँकांची पुरेशी वाढ झाली आहे काय, किंवा नजीकच्या काळांत त्यांची योग्य वाढ होईल अशी त्यांची परिस्थिति दर्शविते काय ? ( २ ) तुमच्या प्रांतांत, संस्थानांत किंवा युनियनमध्यें खेडेगांवी प्रदेशांत इतर प्रकारच्या सुनियंत्रित बँकिंगच्या पद्धति सुरू कराव्यात काय ? किती प्रमाणावर ?

प्रश्न-६ ( १ ) सर्व तऱ्हेच्या अडचणी लक्षांत घेऊन, खेडेगांवी प्रदेशांत बँकिंगच्या सोयी वाढविण्यासाठी तुम्ही कोणते उपाय सुचवितां ? ( २ ) खालील मार्गांनीं हा उद्देश चांगल्या तऱ्हेनें सफळ होईल काय ?—( अ ) सरकारनें ( i ) इंपीरिअल बँकेस, अथवा ( ii ) इतर व्यापारी बँकांना अथवा ( iii ) इतर सहकारी बँकांना मदत देऊन व ठराविक मुदतींत, ठराविक ठिकाणीं, ठराविक शाखा त्यांनीं उघडाव्या अशी व्यवस्था करून, ( ब ) पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकांतील सोईत वाढ करून, अथवा ( क ) ट्रेझऱ्या व सब ट्रेझऱ्या ह्यांत डिपॉझिट अकाउंट उघडण्याची सोय करून. खेडेगांवी प्रदेशांत बँकिंगच्या सोई वाढविण्याच्या कोणत्याहि योजनेंत व्यापारी बँका, सहकारी बँका, पोस्ट ऑफिसें, व ट्रेझऱ्या आणि सब ट्रेझऱ्या नेमका कोणता भाग घेऊं शकतील ? ( ३ ) फिरत्या बँका स्थापन करण्याची तुम्ही सूचना करतां का ? तशी तुमची सूचना असल्यास, अशा बँका चालविण्यास तुमच्या योजनेस येणाऱ्या खर्चाच्या तपशिलाचे आकडे द्या. ( ४ ) सुचविल्यापैकीं कोणते उपाय तात्काळ अमलांत आणण्याजोगे आहेत, ते सांगाल काय ?

प्रश्न-७ खेडेगांवी प्रदेशांत शाखा उघडण्यांत अनेक अडचणी आहेत. त्यांपैकीं, त्यांच्या मिळकतीच्या मानानें त्या चालविण्याचा खर्च ज्यास्त येतो, एवढ्याच अडचणीचा विचार केला तर बँकेला तिची शाखा चालविणें शक्य व्हावें ह्या दृष्टीनें सरकारनें तिला जी मदत द्यावी लागेल, तिचा आकार आणि स्वरूप काय राहील ?

प्रश्न ८-( १ ) तुमच्या प्रांतांतील, संस्थानांतील किंवा युनियनमधील सहकारी बँकांना सरकारकडून किंवा रिझर्व्ह बँककडून कांहीं विशेष सवलती किंवा सहाय्य मिळतें काय ? असल्यास सध्या मिळत असलेल्या सवलतींचें व सहाय्याचें दिग्दर्शन करा. ( २ ) सध्या देण्यांत आलेल्या सवलती अपुऱ्या आहेत असें तुम्हांस वाटत असल्यास, आणखी कोणत्या सवलती तुम्ही सुचवितां, आणि त्यांचा उपयोग कसा केला जाईल ?

प्रश्न-९ सध्या सरकारी कॅशचें काम जेथें इंपीरिअल बँकेच्या शाखा आहेत, तेथें ती पहाते आणि इतर ठिकाणीं सरकारी

ट्रेझऱ्या व सब ट्रेझऱ्या पहातात; ह्या व्यवस्थेविषयीं तुमचें मत काय आहे ? सध्याची व्यवस्था तुमच्या मतें सदोष असल्यास, त्याचें कारण कारभार-विषयक अडचणीं हें आहे, का सध्याच्या पद्धतींत कांहीं मूलग्राही दोष आहेत ? सध्याच्या पद्धतींत कांहीं बदल आवश्यक किंवा योग्य आहे काय ? तसें वाटत असल्यास हा बदल किंवा सुधारणा घडवून आणण्याची दिशा दाखवा.

प्रश्न–१० सरकारी कॅशच्या कामाची व्यवस्था जेथें प्रत्यक्ष सरकारच पहातें, तेथील व्यवस्था शक्य तो बँकेकडे किंवा बँकांकडे वर्ग करावी, असें आपणांस वाटतें काय ?

प्रश्न–११ सध्या एका व्यापारी बँकेस ट्रेझरीच्या कामाची वस्तुतः मोनॉपोली आहे. ही पद्धत तुम्ही तत्त्वतः पसंत करता, का एकापेक्षा अधिक बँकांकडे हें काम सोपविणें तुम्हांस पसंत आहे ? ह्या प्रश्नाचें उत्तर देतांना खालील मुद्दे विचारांत घ्यावेः— (अ) सरकारी पैसा, हिंदुस्थान सरकारच्या दुय्यम नाण्यांच्या डेपोंतील शिलका आणि रिझर्व्ह बँकेच्या करन्सी चेस्टसमधील शिलका ह्यांची सुरक्षितता. (ब) व्यवस्था खर्च. (क) (i) सरकारच्या वतीनें वसुली व बटवडा, (ii) नोटा व नाणीं ह्यांची अदलाबदली, (iii) पैशाची वर्गावर्गी, ह्यांचे बाबत सध्याच्या पद्धतींत उपलब्ध असलेल्या सोई.

खुलासा:—

(१) रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ॲक्टाच्या ३९ व्या कलमाप्रमाणें, नोटा घेऊन रुपये देणें व रुपये घेऊन नोटा देणें, ह्याची जबाबदारी रिझर्व्ह बँकेवर टाकण्यांत आलेली आहे. मोठ्या किंमतीच्या नोटांचे बदली कमी किंमतींच्या नोटा व लहान किंमतीच्या नोटांचे बदली मोठ्या किंमतीच्या नोटा पुरवण्याचीहि तिचेवर जबाबदारी आहे. आपल्या इश्यू खात्याच्या चेस्टस् इंपीरिअल बँकेच्या शाखांचे ठिकाणीं आणि ट्रेझऱ्यांत व सब ट्रेझऱ्यांत राखून रिझर्व्ह बँक ही जबाबदारी पार पाडते. ह्या चेस्टसमध्यें पुरेशा नोटा व रुपये ठेवण्यांत येतात आणि मागणीप्रमाणें देवघेवीचा व्यवहार इंपीरिअल बँकेच्या शाखा आणि ट्रेझऱ्या व सब ट्रेझऱ्या ह्या करतात. जुन्या आणि खराब झालेल्या नोटा प्रसारांतून काढून घेऊन त्यांच्या जागीं नव्या नोटा सोडणें ह्या चेस्टसमुळें शक्य होऊन प्रचलित नोटांची शुद्धता राखतां येतें. इंपीरिअल बँकेच्या शाखा आणि ट्रेझऱ्या व सब ट्रेझऱ्या ह्यांना, आपली जादा शिल्लक ह्या चेस्टमध्यें ठेवण्याची व त्यांतून जरूरीप्रमाणें काढून घेण्याची परवानगी असल्यामुळें, ही पद्धत इंपीरिअल बँकेस व सरकारला फार सोईची होते, कारण ज्या ठिकाणीं चेस्टसची त्यांचेकडे कस्टडी आहे, तेथें कमीत कमी रोख शिल्लक ठेवून त्यांचें काम भागतें. त्याचप्रमाणें, वेगवेगळ्या ठिकाणीं चार्ज न पडतां पैसे पाठवतां येतात.

३१ ऑक्टोबर, १९४९ रोजीं इंपीरिअल बँकेच्या कस्टडींत १४२ चेस्टस् होत्या आणि त्यांत ३,२६,८१,३६,३८० रुपये किंमतीच्या नोटा व नाणीं होतीं. ट्रेझऱ्या व सब ट्रेझऱ्या ह्यांच्या कस्टडींत ९१९ चेस्टस् होत्या आणि त्यांत १,०६,१२,३३,७४१ रुपये किंमतीच्या नोटा व नाणीं होतीं.

त्याचप्रमाणें, लोकांची मोडेची गरज ठिकठिकाणच्या स्मॉल कॉइन डेपोज करवी भागविली जाते. इंपीरिअल बँकेच्या कित्येक शाखा व कांहीं ट्रेझऱ्या येथें हे डेपो आहेत. इंपीरिअल बँकेच्या कस्टडीमधील १०० स्मॉल कॉइन डेपोंत ३१ ऑक्टोबर, १९४९ रोजीं २,४९,४६,६१८ रु. १० आ. एवढीं दुय्यम नाणीं होतीं आणि ट्रेझऱ्यांच्या कस्टडीमधील ११ डेपोंत १६,७६,४३० रुपयांचीं दुय्यम नाणीं होतीं.

(२) मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांचे रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया हे 'स्टॅच्यूटरी बँकर्स' आहेत. सरकारी ट्रेझरी कामाची व्यवस्था इंपीरिअल बँक पहाते, ती रिझर्व्ह बँकेची एजंट ह्या नात्यानें. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ॲक्टच्या ४५ व्या कलमाप्रमाणें त्या दोन बँकांत झालेल्या करारानें त्यांचेमधील संबंध ठरवून दिलेले आहेत. ह्या करारान्वयें, सरकारचे वतीनें जेवढी एकूण रक्कम दरसालतून जमा होते व दिली जाते तिचेवर कमिशन ठरलेलें आहे आणि ट्रेझरीच्या कामाबद्दल इंपीरिअल बँकेस ह्या हिशेबानें कमिशन मिळतें.जमा–नांवें वरील ह्या कमिशनचा हिशेब ३१ मार्च १९५० अखेर संपणाऱ्या चार वर्षांसाठीं खालील कोष्टकाप्रमाणें करण्याचा आहे:—

| | | | |
|---|---|---|---|
| पहिले | १५० | कोटी | एकाचा $\frac{1}{16}$ % |
| त्या पुढील | १५० | ,, | ,, $\frac{1}{32}$ % |
| त्या पुढील | ३०० | ,, | ,, $\frac{1}{64}$ % |
| त्या पुढील सर्व | | | ,, $\frac{1}{128}$ % |

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ॲक्ट अंमलांत आला त्या दिवशीं इंपीरिअल बंकेच्या जेवढ्या शाखा होत्या त्यापेक्षां कमी नाहींत एवढ्या शाखा चालू ठेवण्यासाठीं इंपीरिअल बँकेस एक निश्चित रक्कम दरसाल दिली जाते. चालू चतुर्वार्षिक मुदतीसाठीं ही रक्कम सालिना ४ लक्ष रुपये ठरलेली आहे. ३१ मार्च १९४९ अखेर संपलेल्या वर्षांसाठीं इंपीरिअल बँकेस एकूण २७,०५,७४६ रु. १४ आ. २ पै मोबदला देण्यांत आला, त्याचा हिशेब असा:—

सरकारच्या व रेल्वेजच्या व्यवहाराची देवघेव:—

| | | |
|---|---|---|
| हिंदुस्थान | रु. | ९,७१,७८,८८,२८०– ५–१ |
| पाकिस्तान | रु. | ४८,६५,९६,४७१–१२–८ |
| एकूण | रु. | १०,२०,४४,८४,७५२–१–९ |
| ज्यांचेवर प्रीमिअम आकारण्यांत येत नाहीं, अशा इंपीरिअल बँकेच्या शाखांनीं इश्यू केलेल्या किंवा रकमा दिलेल्या रिझर्व्ह बँक रेमिटन्सेसची एकूण रक्कम | रु. | १,३०,९०,७५,३६३– २–९ |
| एकूण उलाढाल | रु. | ११,५१,३५,६०,११५–४–६ |
| कमिशन | रु. | २३,०५,७४६–१४–२ |
| कराराप्रमाणें शाखा चालू ठेवण्याबद्दल ठरलेला वार्षिक चार्ज | रु. | ४,००,०००– ०–० |
| एकूण कमिशन | रु. | २७,०५,७४६–१४–२ |

(३) रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानें, इंपीरिअल बँक ऑफ इंडियानें आणि ट्रेझऱ्यांनीं व सब ट्रेझऱ्यांनीं इश्यू केलेल्या एकूण रेमिटन्सेसची रक्कम सप्टेंबर, १९४९ अखेर संपलेल्या वर्षीं १५,०१,२०,६३,७२७ रु. (हिंदुस्थान व पाकिस्तान दोन्ही धरून) झाली, तिचा तपशील असा:—

| | | |
|---|---|---|
| रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया | रु. | ६३४,३७,८७,६९९ |
| इंपीरिअल बँक ऑफ इंडिया | रु. | ७८५,५९९१,१३८ |
| ट्रेझऱ्या व सब ट्रेझऱ्या | रु. | ८१,२२,८४,८९७ |
| एकूण | रु. | १५,०१,२०,६३, ७२७ |

प्रश्न–१२ (अ) सरकारी शिलका, (ब) दुय्यम नाण्यांचे डेपो व (क) रिझर्व्ह बँकेच्या इश्यु खात्याच्या करन्सी चेस्टस् हीं त्यांच्या ताब्यांत देतां येतील इतकी सज्जता व्यापारी बँका (इंपीरिअल बँक वगळून) आणि आजच्या घटनेच्या सहकारी बँका ह्यांची आहे, असें तुम्हांस वाटतें काय ?

प्रश्न–१३ (i) जेथें कॅशच्या कामाची सध्या प्रत्यक्ष सरकारमार्फत व्यवस्था पाहिली जाते, तेथील कॅशचें काम (अ) कांहीं निवडक व्यापारी बँकांकडे; (ब) सहकारी बँकांकडे; (क) खेडेगांवी प्रदेशांत शाखांचें जाळें असणाऱ्या आणि सरकारी काम अंगावर घेणाऱ्या नवीन सरकार–पुरस्कृत बँकेकडे सोपविलें, तर बँकिंगच्या सोईंत कितपत वाढ होईल? (ii) ट्रेझरी कामाच्या व्यवस्थेच्या दृष्टीनें वरील तीन पेकीं कोण सर्वांत ज्यास्त सोइस्कर होईल ?

प्रश्न– १४ (१) (i) सध्या ज्या ठिकाणचें ट्रेझरीचें काम इंपीरिअल बँकेकडे नाहीं, तेथील काम व्यापारी बँकांकडे (इंपीरिअल बँक वगळून) सोपवावें अशी तुमची सूचना असल्यास, ज्या बँकांकडे ते सोपविण्याचें, त्यांची निवड कोणत्या तत्त्वांवर करण्यांत यावी ? (ii) सरकारी कॅशचें काम त्यांचेकडे सोंपविण्यापूर्वी वसूल भांडवल, रिझर्व्हज, कारभाराची पद्धति, ह्याविषयीं बँकेनें कांहीं किमान अटी पार पाडल्या पाहिजेत असें तुम्हांस वाटतें काय? (२) (i) बँकांमध्यें ट्रेझरी कामाची वांटणी कशी करावी? (ii) ही वांटणी प्रादेशिक तत्त्वावर करून, प्रत्येक बँकेस एकेका विभागातील कामाची मोनॉपोली यावी काय? हा विभागाचा विस्तार केवढा असावा? (iii) ट्रेझरी काम सोपविण्यास लायक अशा एकापेक्षा अधिक बँका एखाद्या विभागांत असल्या, तर त्यांना तें काम कोणत्या तत्त्वावर देण्यांत यावें? (iv) ह्या कामासाठी निश्चित करावयाच्या विभागांत, ज्या संस्थानांचा व युनियन्सचा हिंदी संघराज्याशीं आर्थिक एकजीव (फिनॅन्शिअल इंटिग्रेशन) १ एप्रिल १९५० पासून होणार आहे अशा संस्थानांचा व यूनियन्सचा समावेश करावा काय? (३) (i) इंपीरिअल बँकेकडे आज ट्रेझरीचें काम सोपविलेलें आहे आणि तिचे व्यवहारांवर कांहीं निर्बंध घातलेले आहेत; अशाच प्रकारचे निर्बंध ज्यांचेकडे आतां ट्रेझरीचें काम सोपवावयाचें, त्या बँकांवर घालावेत काय? घालावेत, असें वाटत असल्यास, कोणते नेमके निर्बंध तुम्हीं सुचवितां ? (ii) अशा निर्बंधांचा परिणाम सध्या उपलब्ध असलेल्या कर्जविषयक सोई कमी होण्यांत होईल, असें तुम्हांस वाटत असल्यास, सद्यःस्थितींत असें होणें श्रेयस्कर होईल काय? ४ (i) ट्रेझरीचें काम सोपविलेल्या व्यापारी बँकांवर सरकारचें कांहीं अंतर्गत नियंत्रण व देखरेख हीं असावींत, असें तुम्हांस वाटतें काय? त्यांचें स्वरूप काय असावें? (ii) विशेषेंकरून, ह्याकरितां सरकारला पुढील गोष्टींचा हक्क असणें श्रेयस्कर होईल काय?—(अ) त्यांचे मॅनेजिंग डायरेक्टर्स व जनरल मॅनेजर्स नेमणें; (ब) त्यांचे सेंट्रल आणि लोकल बोर्डस व त्यांच्या कमिट्या ह्यांवर एक किंवा अधिक सभासद नियुक्त करणें; (क) त्यांच्या आर्टिकल्स ऑफ असोसिएशनला मंजुरी; आणि (ड) त्यांच्या हिशेबाचीं पुस्तकें ऑडिट करणें व शिलका ठराविक कालांतरानें तपासून पहाणें. (५) असें काम सोपविलेल्या बँकेवर सरकारी रोखे डिपॉझिट करण्याचें बंधन असावें काय? असें बंधन असावें, असें तुमचें मत असल्यास, डिपॉझिटची रक्कम किती असावी व ती कशी ठरवावी? (६) बँकांकडे राहूं यावयाच्या सरकारी पैशाच्या व रिझर्व्ह बँकेच्या शिलकांच्या सुरक्षितपणाच्या दृष्टीनें आणखी कोणते उपाय तुम्हीं सुचवितां? (७) ज्या ज्या ठिकाणचें ट्रेझरीचें काम बँकेकडे सोपविण्यांत येईल, त्या त्या सर्व ठिकाणीं बँक आपल्या शाखा ठेवील आणि ह्या शाखा सरकारच्या परवानगीविना बंद केल्या जाणार नाहींत अशी अट ट्रेझरीचें काम बँकेकडे देतांना तिचेवर घालण्यांत यावी काय? (८) (i) ट्रेझरीचें काम करण्याबद्दल बँकांना मोबदला कसा देण्यांत यावा? त्याचें स्वरूप पुढीलपैकीं कोणते असावें? —(अ) शाखा चालविण्याच्या खर्चाचा कांहीं भाग सरकारनें सोसावा, का (ब) बिनव्याजी ठेव ठेवावी, का (क) एकूण सरकारी उलाढालीवर कमिशन यावें, का (ड) पैशाच्या वर्गावर्गीचे बाबत खास सवलती याव्या? (ii) बँकांना इतर प्रकारें मोबदला मिळेल, त्याबरोबरच आणखी त्यांना संरक्षक आणि ट्रेझरीचें इमारतींत जागा हीं सरकारी खर्चानें देण्यांत यावीं काय?

प्रश्न १५–(१) (अ) हिंदी प्रांतांत; (ब) संस्थानांत किंवा त्यांच्या युनिअन्समध्यें, ट्रेझरीचें काम मागण्याचा सहकारी बँकांना कांहीं विशेष हक्क आहे काय? असल्यास, कोणत्या प्रकारें? ट्रेझरीच्या कामामुळें सहकारी बँकांच्या इतर कार्यास आडकाठी येईल काय? (२) सरकारी ट्रेझरीचें काम करण्याच्या सहकारी बँकांच्या पात्रतेविषयीं विश्वास निर्माण व्हावा, असे कोणते फरक किंवा सुधारणा त्यांच्या व्यवहारांत, बँकिंग चौकशी कमिटीनें १९३१ सालीं अहवाल सादर केला त्यानंतर, घडवून आणण्यांत आल्या आहेत? (३) ज्यांचेकडे ट्रेझरीचें काम सोपवावयाचें, त्या सहकारी बँकांची निवड करण्यासाठी कोणत्या अटी तुम्हीं सुचविता? (४) प्रांतिक, संस्थानी किंवा युनियन सरकारें मध्यवर्ती सरकारास व रिझर्व्ह बँकेस आवश्यक ती इंडेम्निटी देण्यास समर्थ नसलीं तर मध्यवर्ती सरकारनें ज्यांचेकडे ट्रेझरी काम सोपविण्याचें, त्या सहकारी बँकांवर कोणतीं नियंत्रणें बसवावीं, म्हणजे त्यांचेकडे (अ) जेथें प्रांतिक सहकारी बँक किंवा दुसरी केंद्रिय बँक असेल तेथें; आणि (ब) जेथें अशी बँक नाहीं तेथें प्रांतांत, संस्थानांत व युनियन्समध्यें रहावयाचा सरकारी पैसा व रिझर्व्ह बँकेच्या शिलका सुरक्षित रहाण्याची खात्री वाटेल? (५) ज्या प्रांतांत, संस्थानांत किंवा युनियन्समध्यें ट्रेझरीचें काम सहकारी बँकांकडे सोपवावयाचें, तेथील प्रांतिक सहकारी बँकांवर ह्या कारणासाठी मध्यवर्ती सरकारनें प्रभावी नियंत्रण ठेवणें जरूर आहे असें तुमचें मत असल्यास, असें नियंत्रण व्यवहार्य होईल असें तुम्हांस वाटतें काय? (अ) सहकारी चळवळीची मूलभूत तत्त्वें व (ब) सहकारी चळवळीवरील प्रांतिक सरकारांचें सध्याचें नियंत्रण व देखरेख ह्यांचेशीं मध्यवर्ती नियंत्रण कितपत सुसंगत होईल?, (६) ट्रेझरीचें काम सहकारी बँकांकडे सोपविण्याची सूचना मान्य करण्यांत आली, तर सरकारा–सरकारांतील व्यवहार, करन्सी चेस्टचे व्यवहार व पैशांची वर्गावर्गी हीं पुरीं करण्याची, एका प्रांताच्या किंवा संस्थानाच्या बाहेर सहकारी बँकांच्या शाखा नसल्याकारणानें, काय व्यवस्था तुम्हीं पुढें मांडतां?

खुलासा:—

(१) सध्याच्या व्यवस्थेप्रमाणें, इंपीरिअल बँकेमध्यें मध्यवर्ती सरकार किंवा प्रांतिक सरकारें ह्यापैकीं कोणीहि शिलका ठेवीत नाहींत. मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांच्या वतीनें बटवडा करावयाचा, तो इंपीरिअल बँक प्रथम आपल्या रोख शिलकांतून करते आणि नंतर तिचें मध्यवर्ती अकाउंट्स ऑफिस रिझर्व्ह बँकेच्या कलकत्ता येथील सेंट्रल अकाउंट्स सेक्शनशी हिशेब पुरा करतें.

मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांचीं मुख्य खातीं तेथेंच ठेवलेलीं असतात. त्याचप्रमाणें वेगवेगळ्या सरकारांच्या वतीनें जमा केलेल्या रकमा प्रथम इंपीरिअल बँकेच्या रोख शिलकांत जमा होतात आणि नंतर दोन्ही बँकांच्या कलकत्ता येथील सेंट्रल अकाउंट्स कचेऱ्या त्यांचा हिशेब पुरा करतात. मध्यवर्ती सरकारच्या वतीनें प्रांतांनीं, किंवा एका प्रांतानें दुसऱ्या प्रांताच्या वतीनें दिल्या घेतलेल्या रकमा ह्यांचाहि कलकत्ता येथें अशाच रीतीनें हिशेब पुरा केला जातो. रिझर्व्ह बँकेचा कलकत्ता येथील सेंट्रल अकाउंट्स सेक्शन हा सरकारांच्या एकमेकांच्या देण्याघेण्याचें क्लिअरिंग हाउससारखें काम करतो.

(२) अकराव्या प्रश्नास जोडलेल्या खुलाशांत म्हटल्याप्रमाणें करन्सी चेस्ट्स बाळगणाऱ्या इंपीरिअल बँकेच्या शाखा आणि ट्रेझऱ्या व सब ट्रेझऱ्या ह्यांना त्या करन्सी चेस्टमधील शिलकांचा उपयोग करतां येतो. ह्या चेस्टमधून पैसे काढले किंवा त्यांत घातले, कीं त्याची माहिती रिझर्व्ह बँकेच्या सर्कल करन्सी ऑफिसरला ताबडतोब द्यावी लागते. तो मग ठेवलेल्या किंवा काढलेल्या निव्वळ रकमेचा इंपीरिअल बँकेशीं किंवा संबंधित सरकारशीं, जरूरीप्रमाणें हिशेब पुरा करतो.

(३) रिझर्व्ह बँकेच्या रेमिटन्स फॅसिलिटीज योजनेप्रमाणें इंपीरिअल बँकेच्या शाखांवर आणि रिझर्व्ह बँकेच्या इश्यू खात्याच्या चेस्टस बाळगणाऱ्या सर्व ट्रेझऱ्यांवर व सब ट्रेझऱ्यांवर रेमिटन्स इश्यू करण्याचा रिझर्व्ह बँकेच्या कचेऱ्यांना अधिकार आहे. त्याचप्रमाणें, इंपीरिअल बँकेच्या शाखांना, जेथें इंपीरिअल बँकेची शाखा नसल्यानें रिझर्व्ह बँकेच्या इश्यू खात्याच्या चेस्टस बाळगण्याचें काम ट्रेझऱ्या व सब ट्रेझऱ्या करतात, त्यांचेवर रिझर्व्ह बँक रेमिटन्सेस इश्यू करण्याचा अधिकार आहे. तद्वतच, अशा चेस्टस बाळगणाऱ्या ट्रेझऱ्या व सब ट्रेझऱ्या इतर ट्रेझऱ्यांवर व सब ट्रेझऱ्यांवर, चेस्टसची कस्टडी असलेल्या इंपीरिअल बँकेच्या शाखांवर व रिझर्व्ह बँकेच्या कचेऱ्यांवर रिझर्व्ह बँक रेमिटन्सेस इश्यू करूं शकतात.

सर्व जमा व नांवे रकमा रिझर्व्ह बँकेच्या वतीनें असल्याचें हिशेबांत दाखविलें जातें आणि इंपीरिअल बँक, मध्यवर्ती सरकार किंवा प्रांतिक सरकारें ह्यांच्या शिलका त्याप्रमाणें कमी-ज्यास्त केल्या जातात. रिझर्व्ह बँकेच्या कलकत्ता येथील सेंट्रल अकाउंटस सेक्शनकडून तशी सूचना मिळाल्यावरच अर्थात् शिलका कमी-ज्यास्त केल्या जातात.

७-(i) ट्रेझरीचें काम करण्याबद्दल सहकारी बँकांना मोबदला कसा देण्यांत यावा?—(अ) शाखा चालविण्याच्या खर्चाचा कांहीं भाग सरकारनें सोसावा? का (ब) बिनव्याजी ठेव ठेवावी? कां? (क) एकूण सरकारी उलाढालीवर कमिशन द्यावें? कां? (ड) पैशाचे वर्गावर्गीचे बाबत खास सवलती द्याव्या? (ii) सहकारी बँकांना इतर प्रकारें मोबदला मिळेल, त्याबरोबरच ट्रेन्ड नोकरवर्ग, संरक्षक आणि ट्रेझरीचे इमारतींत जागा हीं सरकारी खर्चानें देण्यांत यावीं काय?

प्रश्न १६– (१) (i) सरकार-पुरस्कृत नव्या बँकेची स्थापना तुम्हांस मान्य असल्यास, तिच्या भांडवलाची रचना, घटना, अधिकार व कार्यक्षेत्र ह्यांचा तपशील द्या. (ii) ह्या नियोजित बँकेमध्यें सरकारचें अंग किती असावें? (२) पैसे उभारणें आणि ट्रेन्ड नोकरवर्ग व सोइस्कर जागा मिळणें ह्यांचे मार्गांतील अध्याच्या अडचणी लक्षांत घेतां, सद्यःपरिस्थितींत अशा बँकेची स्थापना करतां येण्याजोगी आहे, असें तुम्हांस वाटतें काय? अशा बँकेची स्थापना व्यापारी दृष्ट्या यशस्वी होईल काय? (३) अशा बँकेस आर्थिक मदत द्यावी लागण्याचा संभव तुम्हांस वाटतो काय? संभव वाटत असल्यास, आर्थिक मदतीचें स्वरूप आणि विस्तार काय रहावा?

---

## प्रश्नपत्रिकेचें परिशिष्ट

### कमिटीकडे सोपविलेलें काम

(हिंदुस्थान सरकारचा ठराव नं. एफ (१९६)–एफ आय/४९ ता. ८ नोव्हेंबर १९४९ मधील उतारा)

"घटना समितीमधील रुपयाच्या अवमूल्यनावरील चर्चेच्या वेळीं, खेडेगांवीं प्रदेशांत बँकिंगच्या सोई वाढविण्यासाठी आवश्यक ती सरकारी मदत देण्याची व्यवस्था करण्यासाठी योग्य तो प्रयत्न केला जाईल, अशी हिंदुस्थान सरकारनें हमी दिली होती. तिला अनुसरून सरकारनें खालील कामासाठी एक कमिटी नेमण्याचें ठरविलें आहे:—

(१) खेडेगांवी मुलुखांत बँकिंगच्या सोई वाढविण्यासाठी तात्काळ हातीं घेता येण्याजोग्या योजना सुचविणें.

(२) रोख शिलकांच्या व्यवस्थेची सध्या सरकारी ट्रेझऱ्या आणि सब ट्रेझऱ्या (इंपीरिअल बँकेच्या व्यवस्थेखालील धरून) ह्यांचेमध्यें जी योजना आहे, तिचा ह्या संबंधानें आढावा घेणें.

(३) सरकारी ट्रेझऱ्या व सब ट्रेझऱ्यांची व्यवस्था ज्या ठिकाणीं सध्या इंपीरिअल बँकेमार्फत पाहिली जात नाहीं, अशा ठिकाणचें रोखीचें काम व्यापारी बँका आणि सहकारी बँका ह्यांचेकडे सोपविल्यानें बँकिंगच्या सोईची वाढ कितपत सुलभ होईल, ह्याचा विचार करणें. ह्या संबंधांत खालील बाबींचाहि विचार करणें.

(अ) हिंदी प्रांत व ज्यांचा हिंदी संघराज्याशीं आर्थिक एकजीव १ एप्रिल १९५० नंतर होईल अशीं संस्थानें व युनियन्स ह्यांचेमधील अशा कामाची पुढील व्यवस्था; आणि

(ब) सरकारी ट्रेझऱ्या व सब ट्रेझऱ्या ह्यांच्या रोखीच्या कामाची व्यवस्था, एखाद्या नवीन सरकार-पुरस्कृत बँकेकडे अथवा सध्या अस्तित्वांत असलेल्या एक किंवा अधिक व्यापारी बँकांकडे वा सहकारी बँकांकडे सोपविण्याची इष्टानिष्टता; अशा बँकांनीं पुऱ्या करावयाच्या अटी व त्या बँकांना द्यावयाची मदत.

(४) संस्थानें व युनियन्स ह्यांचेमध्यें ज्या बँका ट्रेझरीचें काम सध्या करीत असतील, त्यांचे संबंधांत शिफारसी करणें.

(५) इतरहि शिफारसी करणें."


**अर्थ**

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें साप्ताहिक.

**प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.**

वर्गणीचे दर :

वार्षिक : ६ रु. सहामाही : ३ रु.

किरकोळ अंक : ६ आ.

जाहिरातीचे दर :

कराराच्या व इतर अटी जाहिरातखात्याकडून मागवाव्यात.

चेक, मनिऑर्डरी, इ. पाठविण्याचा पत्ताः–

"अर्थ"

"दुर्गाविलास" पुणें ४.

## डेक्कन मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन

### भोर येथील अधिवेशनांत मंजूर झालेले तीन ठराव

### (१) सहकार्याचें आश्वासनः परस्पर कायदेशीर व नैतिक संबंध स्पष्ट करण्याची मागणी

हिंदुस्थानचा राष्ट्रीय स्वातंत्र्याचा प्रश्न सुटल्यानंतर राष्ट्राची संकटें कमी होण्याऐवजीं वाढलींच आहेत. देशांत पक्षभेद, मतभेद, वर्गभेद कितीही असले व ते कितीही प्रामाणिक असले तरी आज सर्वांनीं एकोप्यानें आपआपलीं कर्तव्यें स्वार्थत्यागपूर्वक पार पाडून राष्ट्रीय उत्कर्ष घडवून आणला पाहिजे याबद्दल दुमत होणें शक्य नाहीं. उत्पादन वाढ आणि एकंदर सर्वसामान्य जनतेचा संतोष व उत्कर्ष घडवून आणण्यासाठी सर्व वर्गांनीं पुढें यावें म्हणून सरदार पटेल यांनीं गेल्या दि. १४ रोजीं देशांतील सर्व आर्थिक हितसंबंधींयांना जी हाक दिली त्या हाकेस आम्ही दक्षिण महाराष्ट्रीय कारखानदार व धंदेवाले हार्दिक पाठिंबा देत आहोंत. राष्ट्राच्या कल्याणांतच उद्योगधंद्याचा उत्कर्ष साठलेला आहे. राष्ट्रच मरूं घातलें तर उद्योगधंदे जगण्याची आशाच नको, हा सरदार पटेल यांनीं मांडलेला मुद्दा पृथ्वी मोलाचा आहे. आम्ही त्याच्याशीं सर्वथैव सहमत आहोंत. देशांतील इतर वर्गांनीं, विशेषतः कामगार व शेतकरी वर्गानींही, सरदारजींच्या वरील हाकेस होकार देऊन कारखानदार, कामकरी व शेतकरी या तिघांचें एक-जुटीचें व स्नेहभावें सहकार्य आर्थिक उत्पादन सर्व बाजूंनीं कमी खर्चानें व मालाचीं प्रत सुधारून वाढविण्याचे कामीं उत्साहभरानें निर्माण होईल अशीं धोरणें आंखावीत अशी आम्ही त्या वर्गांनाही विनंती करतों. देशाचा औद्योगिक उत्कर्ष कामकरी शेतकरी वर्गांचे हितसंबंध दुर्लक्षून होणार नाहीं अशी आमची खात्री आहे. पण त्याचबरोबर उत्पादन वाढविल्यावांचून कामकरी, शेतकरी, व कारखानदार यांपैकीं कोणाचाही उत्कर्ष होणार नाहीं ही गोष्टही सर्वमान्य होण्यासारखीच आहे. म्हणून कामकरी, शेतकरी व एकंदर जनता यांच्या विकासासाठीं आणि आजच्या आणीबाणीच्या परिस्थितींतून राष्ट्रानें तरून जाण्यासाठी आम्ही दक्षिण महाराष्ट्र कारखानदार आमच्या कर्तव्यकक्षेंत करतां येईल तेवढा शिकस्तीचा प्रयत्न करीत राहण्याचें सरकारला व शेतकरी, कामकरी आणि सर्व सामान्य जनता या सर्वांना जाहीर आश्वासन देतों.

यापुढील औद्योगिक व एकंदर आर्थिक उत्पादनविषयक उत्कर्ष हा सर्व पक्षांच्या प्रतिनिधींनीं एकत्र येऊन आपलीं साधनें व परिस्थिती यांचा विचार करून व उत्कर्षाच्या योजना आंखून राष्ट्रीय हिताच्या निष्ठेनें पार पाडला पाहिजे. अशा योजना आंखण्याचे कामीं आमच्या योग्य प्रतिनिधींमार्फत आमचे सहकार्य मागणें हा सरकारचा हक्क आहे आणि आम्हांला सरकारशीं यशस्वीपणें सहकार्य करतां यावें यासाठी सरकारचें तें कर्तव्यही आहे.

यासाठी सरकारनें कारखानदारांचें नेमकें कर्तव्य काय आणि राष्ट्रीय उत्कर्षाचे कामीं आपल्या उद्योगधंद्यांचीं साधनें वापरून सरकारशीं सहकार्य कसें करावें याबाबत सर्वमान्य अशी नियोजित कल्पना कारखानदार, कामकरी, संबंधित शेतकरी व इतर वर्ग यांना द्यावी. आमचें सहकार्य यशस्वी व्हावें याच इच्छेनें सरकारला ही आग्रहाची विनंती आहे. आर्थिक क्षेत्रांत नैसर्गिक व इतर अडचणी पुष्कळच असल्या तरी वर्गावर्गांच्या संबंधांत कटुता येणें हें उत्पादनाच्या बाबतींतलें फार मोठें संकट आहे. तें निदान आपल्या नियोजनाच्या काळखंडांत उत्पादनाच्या क्षेत्रांत आड येऊं नये यासाठी परस्पर वर्गांचें कायदेशीर व नैतिक संबंध सरकारनें सर्वांच्या विचारानें शक्य तितके निश्चित स्वरूपांत ताबडतोब ठरवून द्यावेत अशी आमची सरकारला आग्रहाची विनंती आहे. आजच्या आणीबाणीच्या प्रसंगांतून राष्ट्र तरून जाण्यासाठी कमींतकमी आवश्यक अशी मागणी सरकारकडे व देशांतील इतर सर्व वर्गांकडे आजच्या राष्ट्रीय संकटकालीं आम्हीं करीत आहोंत

### (२) कोयना धरण

कोयना धरणाचे प्रश्नाला दक्षिण महाराष्ट्राच्या औद्योगिक प्रश्नाच्या दृष्टीनें फार महत्व आहे. या मुलखांत कोळसा अथवा दुसरी कोणतीही औद्योगिक शक्ती नाहीं. संपूर्ण गरज भागविण्याइतकी अशी शक्ती कोयना धरणानें मिळूं शकते, ही गोष्ट सरकारनें आपल्या संशोधकांकरवीं सिद्ध केली आहे. पण या योजनेसंबंधानें मदतीच्या स्वरूपांत निश्चित अशी घोषणा सरकारनें करण्याची निकराची वेळ आली आहे. महाराष्ट्रांतील असंतोषाच्या अनेक कारणांपैकीं एक महत्त्वाचें कारण म्हणजे महाराष्ट्राच्या अंगीं विधायक कर्तबगारी असूनही औद्योगिक साधनांच्या अभावीं महाराष्ट्र आतां खुरटून जाण्याची भीति हें आहे. ही भीति दूर होण्याचें साधन कोयना धरण हें एकच आहे. कोयना धरणापासून उत्पन्न होणारी वीज खपेलच अशी या प्रश्नाचें उत्तर आगाऊच दिल्यावांचून कोयना योजनेचा कार्यक्रम आंखतां येत नाहीं, अशी विचारसरणी कोठें कोठें ऐकूं येते ही सर्वस्वी चुकीची आहे. भूक लागलेलीच आहे. वेळींच अन्न न मिळाल्यास ती भूक अनिष्ट परिणामांत भडकत जाण्याचें संकट आजच आमचें भोंवतीं आहे. म्हणून सरकारनें कोयना योजनेसंबंधानें निश्चित योजना ताबडतोब जाहीर करणें हें काम अत्यावश्यक झालेलें आहे. रुपयांची डॉलर किंमत उतरल्यानंतर औद्योगिक उत्कर्षाच्या कांहीं योजना रद्द केल्या जात आहेत, अथवा लांबणीवर टाकल्या जात आहेत. यामुळें कोयना योजनेचें काय होणार या विषयीं आम्हांला विशेष चिंता वाटत आहे. यावेळीं सरकारला नम्रतापूर्वक सांगूं इच्छितों कीं कोयना धरण योजना यावेळीं कोणत्याही कारणानें लांबणीवर टाकणें हें महाराष्ट्र व कर्नाटक यांच्या दृष्टीनेच नव्हे तर अखील भारताच्या दृष्टीनें औद्योगिक दृष्ट्या धोक्याचें ठरेल. म्हणून कोयना धरण योजना लांबणीवर टाकली जाणार नाहीं असें आश्वासन देऊन तिची सुरुवात केव्हां होणार व ती कशी पुरी होणार याचा कालक्रम सरकारनें जाहीर करावा अशी आमची विनंती आहे.

### (३) संस्थानांतील करारांचें भवितव्य

दक्षिण महाराष्ट्रांतील पूर्वीच्या संस्थानांतील उद्योगधंद्यांना माजी संस्थानाधिपतींनीं इनकमटॅक्स व इतर सवलती दिल्या होत्या. सदर सवलती संस्थानिकांनीं दिलेल्या खुशीच्या देणग्या नसून प्रादेशिक कारणांमुळें निर्माण झालेल्या अडचणी दूर करण्यासाठी या सवलती दिल्या होत्या. आतां संस्थानें विलीन झालीं असलीं तरी त्या प्रादेशिक अडचणी कायम असलेमुळें पूर्वी दिलेल्या सवलती परिस्थिती विचारांत घेऊन चालू ठेवाव्यात व त्याबाबतचा निर्णय त्वरित जाहीर करावा अशी आमची मागणी आहे.

---

**बंगलोरचा टेलिफोनचा कारखाना**—बंगलोरमध्यें काढण्यांत यावयाच्या टेलिफोनच्या कारखान्याच्या इमारती बांधण्यास नुकताच प्रारंभ झाला. कारखान्याच्या इमारतींचे ८ विभाग करण्यांत येणार आहेत. त्यांना ३,५०,००० रुपये खर्च येईल. कारखान्याच्या मजुरांसाठी रहाण्याची जागा आणि एक हॉटेल यांची सोय करण्यांत येणार आहे.

## दि सेन्ट्रल म्युच्युअल विमा कंपनी, लिमिटेड

हेड ऑफिसः—लालगीर चेंबर्स, फोर्ट, मुंबई.

★ नव्या कामाचे मोठे आकडे हेंच केवळ विमा कंपनीच्या यशाचें खरें गमक नव्हे. विमेदारांची योग्य निवड, काटकसरीची शास्त्रशुद्ध पण चोख व्यवस्था याचीच या धंद्यास खरी जरूरी आहे.

आमचा कारभार वरील तत्त्वानुसारच चालतो, याची आजच खात्री करून घ्या.

शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर.

## कूळ व शेत-जमीन कायदा
१९४८

प्रसिद्ध झाला. साधी बांधणी किं. ४ रु.; उत्तम कागद व बांधणी ५ रु.; कूळकायदा (१९३९) तिसरी आवृत्ति किं. ३ रु.; दोन्ही कूळ कायदा सवलतीची किंमत साधी बांधणी ५ रु. व मजबूत बांधणी ६ रु.; मुंबई सावकारी कायदा किं. २॥ रु.; शेतकरी कर्जनिवारण कायदा किं. ४ व ४॥ रु.; घरभाडें नियंत्रण कायदा किं. २ रु.; द्विभार्याप्रतिबंधक कायदा दुसरी आवृत्ति, किं. १ रु.; हिंदु घटस्फोट कायदा किं. १ रु.

नवीन कूळ कायद्याप्रमाणेंच्या खंडाच्या पावत्या. २५ पावत्यांच्या पुस्तकास ८ आणे.

पत्ता— लॉ अॅकॅडेमी, ७२० सदाशिव, पुणें २.

श्री——श्री——श्री——श्री——श्री

श्री

# दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

## युद्धोत्तरकालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण
वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री——श्री——श्री——श्री——श्री

## पाकिस्तानी रुपयाच्या नव्या किंमतीची अंमलबजावणी

### रोखे धारण करणारांचें नुकसान

हिंदुस्थान सरकारचे रोखे व त्यांवरील व्याज हीं पाकिस्तानांत मिळविण्याविषयीं त्यांचेवर शेरा असेल, तर त्यांना पाकिस्तानी रुपयाच्या नव्या हुंडणावळीप्रमाणेंच रक्कम मिळेल, असें स्टेट बँक ऑफ पाकिस्ताननें जाहीर केलें आहे. म्हणजे, १४३११ हिंदी रुपयांचे पाकिस्तानी १०० रुपये ह्या नव्या दरानें, पूर्वी हिंदी १०० रुपयांचे पाकिस्तानी १०० रुपये मिळत ते आतां फक्त ६९ रु. ८ आ. (पाकिस्तानी) मिळतील. पाकिस्तानी रुपयाची ही किंमत प्रभावी असती, तर त्याचे हिंदी रुपयांत रुपांतर करतांना पुन्हां १०० रुपये मिळाले असते. परंतु प्रत्यक्ष वस्तुस्थिति तशी नाहीं. त्यामुळें पाकिस्तानांतील ज्या लोकांचेजवळ हिंदी सरकारचे रोखे आहेत, त्यांचें मोठें नुकसान होणार आहे. ह्याच्या उलट, कित्येक हिंदी बँकांजवळ पाकिस्तानांतील रोखे आहेत, (पंजाबची कर्जें, कराची पोर्टट्रस्टचीं कर्जें, इ.) त्यांना १०० रुपयांचे १४४ रु. मिळणार काय, असा प्रश्न विचारण्यांत येत आहे.

---

### पार्लमेंटांत आर्थिक प्रश्नांवर प्रकाश

मुंबई हायकोर्टानें केलेल्या नव्या नियमांनुसार, तेथें काम करीत असलेल्या अटर्नेनें आपल्या आशिलांच्या पैशाचें बँकेंत खातें ठेवलें पाहिजे व ह्या खात्याचें नांवांत "अशील (क्लायंट)" असा शब्द घातला पाहिजे. नियमांत नमूद असलेल्या कारणांपुरतेंच हें खातें अटर्नें चालवूं शकेल. ह्या नियमाचा एक परिणाम असा झाला की, बँकेस "ट्रस्ट" ची नोटीस मिळून पैसे काढले जाण्याच्या प्रत्येक प्रसंगीं तिनें त्याच्या कारणाची चौकशी करण्याचें बँकेवर बंधन आलें. बँकेवरील ही जादा जबाबदारी दूर करून चेक्सची देवघेव सुकर करण्यासाठी भारत सरकारनें पार्लमेंटांत एक बिल आणलें, तें मंजूर झालें. तूर्त त्याची अंमलबजावणी मुंबई शहरापुरतीच मर्यादित आहे.

× × × ×

इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनच्या शेअर्सना "अप्रूव्हेड सिक्युरिटीज" चा दर्जा देणें, हा दुसऱ्या बिलाचा उद्देश आहे. तिसऱ्या बिलाचा हेतु रिझर्व्ह बँकेस इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनच्या वतीनें कर्जें उभारून त्यांची व्यवस्था पहाण्याचा अधिकार देणें, हा आहे. मध्यवर्ती आणि प्रांतिक सरकारांच्या कर्जाची व्यवस्था रिझर्व्ह बँकेकडे आहे. त्याप्रमाणेंच इं. फि. कॉर्पोरेशनच्या कर्जांचीहि व्यवस्था आतां पाहिली जाईल.

× × × ×

पश्चिम बंगालमधील शेड्यूल्ड बँकांवरील आपत्ति आणि त्या संबंधांतील रिझर्व्ह बँकेची कामगिरी, ह्याविषयीं डॉ. जॉन मथाई ह्यांनीं खालील माहिती सांगितली. प. बंगालमधील पांच बँका बंद पडल्या, त्यांत ५ कोटी, ३८ लक्ष रुपयांच्या ठेवी गुंतलेल्या आहेत. जिंदगीची पुस्तकी किंमत ६ कोटी, ७३ लक्ष रुपये असली तरी त्यापैकी बरीच कमी रक्कम प्रत्यक्ष वसूल होईल. अनुभवी नोकरवर्गाचा अभाव, कर्जांचें मोठें प्रमाण, शाखा वाढविण्यांत भरमसाटपणा, रिझर्व्हज अपुरे असतांना भारी दरानें डिव्हिडंड वांटणी, सरकारी रोख्यांचे सोडतीचे व्यवहार, कर्जें देण्याचें अयोग्य धोरण, इत्यादि गोष्टी बँका बुडण्यास कारणीभूत झाल्या.

### श्री. दादा दांडेकरः अल्पपरिचय

सुप्रसिद्ध जी. जी. दांडेकर मशीन वर्क्सचे जनक व सुप्रसिद्ध निष्ठावंत महाराष्ट्रीय कारखानदार श्री. गोपाळ गणेश ऊर्फ दादासाहेब दांडेकर ह्यांचा षष्ट्यब्दिपूर्ती समारंभ ता. २१ ऑक्टोबर १९४५ रोजीं त्यांचे स्नेही, चहाते व अभिमानी ह्यांनीं मोठ्या उत्साहानें घडवून आणला. त्यासाठी श्री. विठ्ठलराम शिवलाल लाहोटी ह्यांच्या अध्यक्षतेखाली "दांडेकर सत्कार समिति" निवडण्यांत आली होती. तिचे श्री. के. श्री. कर्वे व श्री. श्री. वै. धामणकर हे संयुक्त चिटणीस होते. समारंभाचे वेळीं श्री. दादासाहेबांचा परिचय करून देणारें पुस्तक समितीनें प्रसिद्ध केलें होतें, त्यांत आतां वाढ करून हें व्यापक पुस्तक प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. सत्कार समारंभाचें वर्णन, उत्कर्षसोपान, श्री. दादासाहेबांचें भाषण, कुंडली वर्णन, आठवणी आणि अभिप्राय, संदेश, इत्यादि विभागांत पुस्तकाची मांडणी करण्यांत आली आहे. समारंभाचीं व इतर कांहीं चित्रेंहि देण्यांत आलीं आहेत. श्री. दादासाहेब दांडेकर ह्यांच्या चरित्राचें रहस्य लक्षांत घेऊन त्याप्रमाणें उत्कर्ष घडवून आणण्यास प्रस्तुत पुस्तकाचा उपयोग होण्याजोगा आहे. किं. १२ आ.

---

### मध्यवर्ती सरकारास रेल्वेजकडून दरसाल २८ कोटी रु. निश्चित मिळणार

१९२४ सालीं रेल्वेजचें उत्पन्न मध्यवर्ती सरकारच्या उत्पन्नांतून बाजूस काढण्यांत आलें आणि रेल्वेजच्या नफ्याचा कांहीं भाग मध्यवर्ती उत्पन्नांत ठराविक नियमांप्रमाणें सामील होऊं लागला. ही रक्कम दरसाल कमी-जास्त होऊं लागली आणि हे नियम गुंतागुंतीचे व अडचणीचे वाटूं लागले. रेल्वेज व मध्यवर्ती सरकार ह्यांचेमधील आर्थिक संबंध सोप्या आधारावर निश्चित करण्याची योजना सुचविण्याचें काम रेल्वे कन्व्हेन्शन कमिटीकडे सोपविण्यांत आलें. हिंदी रेल्वेजमध्यें गुंतलेल्या भांडवलावर ४% डिव्हिडंड इतकी रक्कम पांच वर्षेपर्यंत रेल्वेजनीं मध्यवर्ती सरकारला द्यावी, अशी कमिटीची शिफारस आहे. आज रेल्वेजमध्यें गुंतलेलें भांडवल ७२५ कोटी रुपये आहे. ह्या हिशेबानें मध्यवर्ती अंदाजपत्रकांत दरसाल त्याच्या ४% म्हणजे २९ कोटी रुपये दाखल होतील.

---

### इनकम टॅक्सची प्रांतांत वाटणीः देशमुख अवार्ड

मध्यवर्ती सरकारला इनकम टॅक्सचे सुमारें १४० कोटी रुपये सालिना मिळतात, त्यापैकीं सुमारें ४० कोटी रुपये प्रांतांना वाटून दिले जातात. "नीमायर अवार्ड" प्रमाणें ही वाटणी केली जाते. वास्तविक, मुंबई प्रांतांतून दरसाल सुमारें ७० कोटी रुपये इनकम टॅक्स वसूल झाला, तरी त्याच्या वाट्यास फक्त ९ कोटी रुपयेच येतात. वसुलीच्या प्रमाणांत जरी मुंबई प्रांताला उत्पन्नाची वाटणी मिळाली नाहीं, तरी तींमध्यें वाढ होण्यास पुष्कळच जागा आहे. इनकम टॅक्सच्या वाटणीचें येत्या पांच वर्षांकरितां प्रमाण ठरवून देण्याचें काम भारत सरकारनें सर चिंतामण देशमुख ह्यांचेकडे सोपविलें आहे. त्यांचा निर्णय सरकारनें स्वतःवर बंधनकारक ठरविला आहे.

---

### पुणें सें. को. बँक संघ वि. स. प. कॉलेज (कार्पेंडे) संघ

वरील संघांचा क्रिकेटचा मित्रत्त्वाचा सामना गेल्या आठवड्यांत स. प. कॉलेजच्या मैदानावर झाला. बँकेनें २१५ धावा केल्या. त्यांत मोहोनी (८०), बोरकर (४५), खोले (५), तुळशीबागवाले (१२), पांडव (२५), पाटसकर (०) अशा वैयक्तिक धावा झाल्या. स. प. कॉलेजच्या १९० धावा होऊन बँकेचा जय झाला.

### शेडयूल्ड बँकांची एकत्रित परिस्थिति

( आकडे कोटी रुपयांचे )

| | २४-९-१९४८ | २४-६-१९४९ | ३०-९-१९४९ |
|---|---|---|---|
| एकूण देणें | ९९३ | ८७५ | ८६० |
| "डिमांड" देणें | ६८८ | ५९४ | ५९४ |
| त्याचें एकूण देण्याशीं प्रमाण | ६९% | ६८% | ६९% |
| "टाइम" देणें | ३०५ | २८१ | २६६ |
| त्याचें एकूण देण्याशीं प्रमाण | ३१% | ३२% | ३१% |
| रोख व रिझर्व्ह बँकेंत ठेव | १३१ | १०८ | ९५ |
| त्याचें एकूण देण्याशीं प्रमाण | १३% | १२% | ११% |
| दिलेलीं कर्जें | ४०५ | ४६० | ४२२ |
| त्यांचें एकूण देण्याशीं प्रमाण | ४१% | ५३% | ४९% |

वरील तक्त्यावरून, शेडयूल्ड बँकांकडील ठेवींत झालेला घट, दिलेल्या कर्जाचें एकूण देण्याशीं थोडें उतरलेलें प्रमाण, इत्यादि गोष्टी स्पष्ट होतील. शेडयूल्ड बँकांनीं कायद्याप्रमाणें रिझर्व्ह बँकेंत जेवढी रक्कम ठेवलीच पाहिजे, तिचेपेक्षां ५३ कोटी रु. अधिक रक्कम २४–९–१९४८ रोजीं त्यांनीं ठेवली होती. २४–६–१९४९ रोजीं ती ३५ कोटी रुपयांनीं ज्यास्त होती व ३०–९–१९४९ रोजीं ती फक्त २८ कोटी रुपयांनीं अधिक होती.

### अन्न पिकांसाठी चांगलें खत

मुंबई प्रांतांत शेणखताचा दर्जा व उत्पादन वाढविण्यासाठी मुंबई सरकारनें अंदाजें ३५,१४,१७७ रुपयांची एक योजना मंजूर केली आहे. सदरहू योजना दोन वर्षें व पांच महिने मुदतीची असून ती १ आक्टोबर १९४९ पासून सुरू होऊन २९ फेब्रुवारी १९५२ रोजीं संपेल. गुराचे गोठे सुधारणे, शेतांतील व गावांतील सर्व प्राणिज टाकाऊ पदार्थ गोळा करणें व ते गुराच्या गोठ्यांत मूत्र शोषून घेण्यासाठीं पसरणें, खताचे पद्धतशीर खड्डे खोदून ते भरणें, इत्यादि बाबींचा या योजनेंत समावेश केलेला आहे. खेड्यास प्रत्येक नवीन खड्डा खोदण्यास दोन रुपये या प्रमाणें आर्थिक मदत देण्यांत येईल. ही मदत ग्रामधान्योत्पादन समितीला देण्यांत येईल व नंतर सदरहू समिति खेड्याच्या हितासाठी या मदतीचा उपयोग करील. या योजनेमुळें खताच्या उत्पादनांत ५० टक्के वाढ होईल आणि मुंबई प्रांतांतील खतांतील नायट्रोजनच्या प्रमाणांत ७/१० ते १ ३/१० टक्के वाढ होईल असा अंदाज आहे.

### फॉरेस्ट लेबरर्स को-सोसायट्यांची दुसरी परिषद

वरील परिषद् ता. १० व ११ रोजीं मुंबई येथें कौन्सिल हॉलमध्यें श्री. जे. सी. कुमारप्पा ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरणार आहे. तिचें उद्घाटन अर्थमंत्री ना. वैकुंठराय मेहता हे करणार आहेत. ह्या परिषदेस जोडून आदिवासी जीवनाचें एक प्रदर्शन भरविण्याचाहि विचार आहे.

### बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि.

वरील कंपनीस गेल्या वर्षी १,४२,०४७ रु. निव्वळ नफा झाला असून नेहमीप्रमाणें १०% डिव्हिडंड सुचविण्यांत आलें आहे.

बेडेकर मसाले वापरा

भोर स्टेट बँक लि.

मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

अधिकृत भांडवल रु. ५,००,०००
खपलेलें भांडवल रु. ५,००,०००
वसूल भांडवल रु. २,५०,०००
गंगाजळी व इतर फंडस् रु. ६७,०००

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. मू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल. बी. — श्री. वा. ग. धंदुके.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्ष मुदतीसाठीं कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी

पुणें कचेरी ५१५ बुधवार — अधिक माहितीसाठीं लिहा. रा. गो. आगाशे, बी. ए. (ऑ.) मॅनेजर.

Dr. WAMAN GOPAL'S SARSAPARILLA
BEST BLOOD PURIFIER




हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद् वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.